# महाराष्ट्र शासन
## समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
## ३ चर्च पथ, पुणे-४११ ००१

दूरध्वनी क्र. २०-२६१२६३०७/२६१२०५६० ईमेल - dydirmavak.socwelfare@maharashtra.gov.in/sakalyanpunenahas@gmail.com


---

जा.क्र.सकआ/नाहसं/र.आ.घरकुल/प्र.क्र. /२०१६/का-१२/ ८७६ दिनांक : ५ ऑक्टोबर,२०१६

**ई-मेलव्दारे/तात्काळ**

**प्रति,**

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)

**विषय :** रमाई आवास घरकुल योजना ग्रामिण क्षेत्रातील घरकुलाच्या संदर्भात सुधारणा करण्या बाबत .

**संदर्भ :** शासन निर्णय क्र. रआयो-२०१६/प्रक्र ५७८/ बांधकामे, दि. ३० सप्टेबर, २०१६

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, रमाई आवास घरकुल योजने अंतर्गत शासनाने संदर्भातील शासन निर्णयाप्रमाणे सुधारणा केलेली असून लाभार्थी निवड पध्दती व निकष यामध्ये बदल करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सदर योजनेसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या तरतूदींची कार्यपध्दती सुध्दा बदलण्यात आलेली आहे. आता सदर्भातील सुधारीत शासन निर्णया प्रमाणे ग्रामिण भागातील लाभार्थिंच्या निवडी बाबत स्वयंस्पष्ट सुचना देण्यात आलेल्या असून, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली "घरकुल निर्माण समिती", पुनर्गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचे सदस्य सचिव हे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (संबंधित) हे आहेत.

तसेच ग्रामविकास विभागाच्या दि. १०/२/२०१६ च्या शासन निर्णया अन्वये प्रधान सचिव (ग्रामविकास) यांचे अध्यक्षतेखाली "कार्यकारी समिती", स्थापन करण्यात आलेली असल्याने सचिव (सामाजिक न्याय विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेली "घरकुल योजना समन्वय समिती", रद्द करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने या पत्राद्वारे सूचित करण्यात येते की, सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे सहमतीने निवड समितीची बैठक आयोजित करून लाभार्थी निवडीची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

**सोबत : शासन निर्णय.**

**आयुक्त, समाज कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रतिलिपी : माहितीसाठी**

१) मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२) मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
३) सहसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
४) प्रादेशिक उपआयुक्त समाज कल्याण (सर्व)
५) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

**रमाई आवास घरकुल योजनेत ग्रामीण क्षेत्रातील घरकुलाच्या संदर्भात सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
शासन निर्णय क्रमांक रआयो-२०१६/प्र.क्र.५७८/बांधकामे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० सप्टेंबर, २०१६.

**संदर्भ:-** :- १) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि. क्र.बीसीएच-२००८/ प्र.क्र.३६/ मावक-२, दिनांक १५.११.२००८.

२) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि. क्र.बीसीएच-२००९/ प्र.क्र.१५९/ मावक-२, दिनांक ९.३.२०१०

३) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि. क्र.बीसीएच-२००९/ प्र.क्र.१५९/ मावक-२, दिनांक २.१२.२०१०

४) शासन ज्ञापन, सा.न्या.व वि.स.वि. क्र.रआयो-२०१४/ प्र.क्र.१०/ बांधकामे, दिनांक १८.७.२०१४.

५) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र.इंआयो-२०१५/प्र.क्र.४१३/योजना-१०, दि.१०/२/२०१६.

**प्रस्तावना :-**

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील लोकांचे राहणीमान उंचावणे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्यासाठी शासनाने अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना शासन निर्णय दिनांक १५.११.२००८ अन्वये सुरु केली आहे. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णय दि.९.३.२०१० अन्वये सदर योजना सुधारीत करण्यात आली आहे. राज्यात राबविण्यात येणाऱ्या इंदिरा आवास योजना या केंद्र पुरस्कृत योजनेसह सामाजिक न्याय विभागाची रमाई आवास योजना, आदिवासी विकास विभागाची शबरी आदिवासी घरकुल योजना व गृहनिर्माण विभागाची राजीव गांधी निवारा योजना क्र.१ व २ या राज्य पुरस्कृत ग्रामीण योजनांची प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रण होण्यासाठी ग्राम विकास विभागाने त्यांच्या संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये राज्य व्यवस्थापन कक्ष- इंदिरा आवास योजनेची व्याप्ती वाढवून राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कक्षात रुपांतरीत करण्यास मान्यता दिली आहे.

केंद्रशासनाच्या दि.१३ एप्रिल,२०१६ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार इंदिरा आवास योजनेच्या नावात बदल करून प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामिण (PMAY-G) लागू करण्यात आली आहे.या योजनेमध्ये लाभार्थी निवड 'सामाजिक,आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११)' प्राधान्य क्रम यादी (Generated Priority List)मधून करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर योजनेतंर्गत

Social Economic Caste Census 2

सन २०१९ पर्यंत ग्रामीण भागातील व सन २०२२ पर्यंत नागरी भागातील प्रत्येकाला पक्के घर देण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. सदर योजनेंतर्गत लाभार्थींची निवड SECC डाटामधून केली जाणार आहे. राज्यातील सर्व मागासवर्गीयांना सन २०१९ पर्यंत स्वत:चे पक्के घर उपलब्ध करुन देण्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी जाहिर केले आहे.तद्नुषंगाने,प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार रमाई आवास योजना संपूर्णपणे सुधारीत करण्याच्या प्रस्तावावर स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे.सद्य:स्थितीत प्रधान मंत्री आवास योजनेंतर्गतच्या लाभार्थी निवडीबाबतच्या मार्गदर्शक सूचना/ निकष विचारात घेऊन त्याअनुषंगाने रमाई आवास योजनेसाठी करावयाच्या लाभार्थी निकष/निवडीबाबतच्या सूचना सुधारीत करून स्वयंस्पष्ट सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती:-

## शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेवून रमाई आवास घरकुल योजनेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

आतापर्यंत इंदिरा आवास योजना या केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत होता त्यामुळे या विभागाच्या ग्रामीण क्षेत्रातील रमाई घरकुल योजनेंतर्गत निकषांनुसार लाभार्थी निवडताना ग्राम विकास विभागाने इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या यादीतील मागासवर्गीय लाभार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे असे संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये कळविण्यात आले होते.मात्र आता केंद्रशासनाने इंदिरा आवास योजनेऐवजी प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) सुरू केली असून त्यामध्ये लाभार्थींची निवड सामाजिक, आर्थिक, जात, जनगणनेनुसार (SECC) केली जात आहे.त्यानुसार संदर्भ क्र.२ व ३ येथील शासन निर्णयातील निकषांत तद्नुसार बदल करणे आवश्यक आहे.सबब खालीलप्रमाणे सुधारीत निकष ठरविण्यात येत आहेत :-

१) लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील असावा.

२)लाभार्थ्याचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षांचे असावे.

३)लाभार्थी हा बेघर असावा किंवा त्याच्याकडे पक्के घर नसावे.

४)लाभार्थी कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण क्षेत्रासाठी रु.१ लक्ष राहील.

५)लाभार्थी "सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) प्राधान्य क्रम यादीच्या (Generated Priority List) निकषा बाहेरील असावा. कारण प्रधानमंत्री आवास योजना -ग्रामीण (PMAY-G) लाभार्थी निवडीसाठी "सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ (SECC-२०११) "प्राधान्य क्रम यादीतून (Generated Priority List) निवडण्यात येणार आहेत.

२. संदर्भाधीन शासन निर्णय दि.९/०३/२०१० अन्वये लाभार्थी निवड प्रक्रियेबाबत सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत.आता सदर सूचना खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत:-

१) या योजनेंतर्गत ग्रामीण भागामध्ये अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची निवड ग्राम सभेमार्फत करण्यात यावी.

२) ग्राम सभेने निवड केलेल्या अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची अंतिमत: निवड करण्याकरीता संदर्भ क्र.२ वरील दि.९/३/२०१० च्या शासन निर्णयातील १४ (अ) नुसार ग्रामीण क्षेत्राकरीता स्थापन केलेली घरकुल निर्माण समिती खालीलप्रमाणे पुनर्गठीत करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १) | मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| २) | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य |
| ३) | प्रकल्प संचालक,डी.आर.डी.ए. | सदस्य |
| ४) | कार्यकारी अभियंता,जिल्हापरिषद (सा.बां.वि.) | सदस्य |
| ५) | सहायक आयुक्त,समाजकल्याण | सदस्य सचिव |

३) ग्राम विकास विभागाच्या संदर्भ क्र.५ वरील दि.१०/२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (ग्राम विकास) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात आलेली असल्यामुळे संदर्भ क्र.२ वरील दि.९/३/२०१० च्या परिच्छेद १६ अन्वये सचिव (सामाजिक न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेली "घरकूल योजना समन्वय समिती" ग्रामीण क्षेत्राकरीता रद्द करण्यात येत आहे.

३. लाभार्थी निवडीमध्ये अनुसूचित जाती संवर्गातील अपंग लाभार्थ्यांना किमान ३ % घरकुले देणे बंधनकारक राहील.शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.विसआ २०१५/प्र.क्र.८५/बांधकामे दि.१५ मार्च २०१६ मधील तरतूदीनुसार ७/१२ उताऱ्यासंबंधातील अट शिथिल करण्यात आली असून तदनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. रमाई आवास योजनेबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांतील इतर तरतूदी अबाधित राहतील. राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण या कक्षास निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत रमाई आवास घरकुल योजनेकरीता दरवर्षी ग्राम विकास विभागास निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकतेस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक

क्र.२०१६०९२८१११००५८६२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( जा.मा.गोसावी )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.सभापती, विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
मा.अध्यक्ष, विधानसभा, विधान भवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कक्ष, नवी मुंबई.
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.
आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व मुख्याधिकारी नगरपालिका / नगरपरिषद.
प्रादेशिक उपायुक्त, (सर्व) समाजकल्याण.
सहायक आयुक्त (सर्व) समाजकल्याण विभाग.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई/नागपूर
वित्त विभाग (व्यय-१४/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉइंट, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
निवडनस्ती (बांधकामे)